# चंद्रपूर कृती आराखडा

## आढावा बैठक दि. २० डिसेंबर २०११ चे इतिवृत्त

चंद्रपूर जिल्हयातील CEPI कमी करण्यासाठी आवश्यक प्रदूषण नियंत्रणाकरीता करण्यात आलेल्या कृती आराखडयाची बैठक मा. पर्यावरण व सांस्कृतीक मंत्री, माननिय श्री. संजय देवतळे, यांचे अध्यक्षतेखाली दि. २०/१२/२०११ रोजी उद्योग भवन नागपूर येथे घेण्यात आली. बैठकीमध्ये उपस्थित मान्यवरांची यादी सोबत जोडलेली आहे.

बैठकीच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर तर्फे श्री किशोर पुसदकर, प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी यांनी कृती आराखडयाचे सादरीकरण करुन सद्य:स्थिती बाबत विवेचन केले.

श्री वि. मो. मोटघरे, सह-संचालक (हवा प्रदूषण नियत्रण) यांनी मे. बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्ट लि., बल्लारपूर या कारखान्यांकडून रु १ कोटीची बँकेची हमी विविध कामे करण्याकरीता घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यामध्ये वनजमीनी शेजारी चुनखडीच्या ढिगाऱ्यांच्या मागे तीन ते चार मिटर ऊंच भित बांधणे, अघातक चुनखडीचा गाळाच्या विल्हेवाटीसाठी लोकवस्तीपासून दूर असलेली पर्यायी जागा शोधून भू-भरणासाठी योग्य आराखडा तयार करणे इत्यादींचा समावेश असल्याचे सांगितले.

मा. मंत्री यांनी वॉशरिज मधून होणाऱ्या हवा प्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होत असल्याबाबत सांगुन याबाबत कारखान्याने योग्य ती यंत्रणा वापरणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावर सहसंचालक (हवा प्रदूषण नियंत्रण) यांनी सांगितले की, वाशरीज प्रकल्पांना कोळसा खाण आवारात स्थलांतर करण्याबाबत अनुमतीपत्रामध्ये अट टाकण्यात आल्याची माहिती दिली. यावर प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, चंद्रपूर विभागातील मे. एसीबी (इंडिया) लि., ता. राजुरा या वॉशरीने वेकोलि यांचेकडे उपरोक्त बाबतीत पत्र व्यवहार केला असता वेकोलिने वाशरीसाठी त्यांच्या आवारात जागा देता येणार नाही, असे कळविले आहे.

श्री एन. बी. वटी, आयुक्त, महानगरपालिका चंद्रपूर यांनी चंद्रपूर शहराकरीता उभारण्यात येत असलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्राचे काम माहे मार्च २०१२ पर्यंत पूर्ण होणार असल्याबाबत सांगितले.

मा. पर्यावरण मंत्री यांनी चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राच्या विस्तारीकरण प्रकल्पातील धूरांड्याची चिमणी उभारणी अगदी शहराजवळ होत असल्याचे दिसून येत असल्याबाबत मत व्यक्त केले व नवीन प्रकल्पाला हवा प्रदूषकांचे कोणते निकष देण्यात आले असे विचारण्यात आले.

मा. सह-संचालक (हवा प्रदूषण नियंत्रण) यांनी सदर विस्तारीकरण प्रकल्पाला धुरांड्यातुन उत्सर्जित होणाऱ्या हवेमध्ये धुळीकणांचे प्रमाण ५० मिलीग्रॅम प्रती घन मिटर पेक्षा कमी असावे, अशी अट घातलेली असल्याचे तसेच राखेची विल्हेवाट राखेच्या बंधाऱ्यात होणार असल्याबाबत सांगितले.

मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी रस्त्यालगत असलेल्या काही कोल डेपो मालकांजवळ अकृषक परवाना असल्याचे व बऱ्याचश्या कोल डेपो मालकांकडे अकृषक परवाना नसल्याबाबत सांगितले. बरेचशे कोल डेपो वणी येथे स्थालांतरीत झाले व बंद झाल्याबाबत सांगितले. उर्वरित कोल डेपो मालक रस्त्यावर व परिसरात पाणी फवारणी करीत असल्याचे सांगितले.

प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांनी नमूद केले की, मा. पर्यावरण राज्यमंत्री यांनी दि. २२/०२/२०१० रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये चंद्रपूर येथील कोल डेपो कडून होणाऱ्या कोळशाच्या किरकोळ विक्रीवर जिल्हाधिकाऱ्यांनी बंदी घालावी, असा मुद्दा असल्याचे सांगितले. त्यावर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी सूचित केले की, कायदेशिररित्या अशी बंदी घालता येणार नाही.

मा. पर्यावरण मंत्री यांनी आरोग्य विषयक अहवाल तयार करण्यासंबंधी सूचना केली.

मा. सचिव, पर्यावरण विभाग यांनी ग्रीन पिस या संस्थाने सिंगरोली येथे आरोग्य विषयक अभ्यास करुन अहवाल तयार केला असल्याचे व त्याच प्रकारे चंद्रपूर जिल्ह्याकरीता आरोग्य विषयक अहवाल तयार करण्यासंबंधी मत व्यक्त केले.

मा. आयुक्त, महानगरपालिका चंद्रपूर यांनी पूणे येथील संस्थेला शहरासाठी अंतर्गत वाहतुकीची व्यवस्था सुरु करण्याची बाब तपासून पाहण्यासंबंधी विनंती केली असल्याचे कळविले.

चंद्रपूर शहरासाठी रिंगरोड बनविण्याकरीता जिल्हासाठी मंजूर २५० कोटी निधी उपयोगात आणला जाऊ शकतो असे मत मा. पर्यावरण मंत्री यांनी व्यक्त केले.

सदर बैठकीत मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ हे सुध्दा उपस्थित असल्याने त्यांनी वणी शहरातील कोल डेपो व वाशरी उद्योगामुळे प्रदूषणाचा त्रास होत असल्याबाबत सांगितले व यवतमाळ जिल्हासाठी कायमस्वरुपी मप्रनिमंडळचे कार्यालय देण्यासंबंधी मत व्यक्त केले. प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांनी महिन्यातून तिसऱ्या बुधवारी मंडळाचा एक अधिकारी यवतमाळ जिल्हा औद्योगिक केंद्रात उपस्थित होत असल्याचे सांगितले.

यानंतर मा. मंत्री महोदयांनी बैठकीस उपस्थित असलेल्या सर्वांचे आभार व्यक्त करुन बैठक संपल्याचे जाहीर केले.

## उपस्थितांची यादी

१. मा. श्री. संजय देवतळे, मंत्री, पर्यावरण व सांस्कृतीक कार्य, महाराष्ट्र शासन.

२. मा श्रीमती वलसा नायर सिंग, सचिव, पर्यावरण विभाग

३. मा. श्री. मिलिंद म्हैसकर, सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

४. मा. श्री. विजय वाघमारे, जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

५. मा. श्री. श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी, यवतमाळ

६. मा. श्री एन बी वटी, आयुक्त, महानगरपालिका चंद्रपूर

७. मा. श्री. व्ही. एन. मोटघरे, सहसंचासक (हवा प्रदुषण नियंत्रण) मुंबई.

८. श्री. नि. गु. निहूल, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर.

९. श्री. किशोर पुसदकर, प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर